# महाराष्ट्र शासन

सहसंचालक (उच्च शिक्षण)

१७ आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१

Website: www.jdhepune.org E-mail – jdhepune@gmail.com

दूरध्वनी क्रमांक – ०२० - २६१२७८३३, ०२०-२६०५१६३२ फॅक्स क्र. ०२०- २६०५१६३२


क्रमांक -ससं/उशि/निवडणूक/पुवि/२०२४ दि. ०६/०७/२०२४

**महत्वाचे - राष्ट्रीय शैक्षणिक धोरण**

प्रति,

१. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

२. कुलसचिव, सर्व विद्यापीठे, पुणे विभाग,

३. प्राचार्य / प्राचार्या, सर्व अशासकीय अनुदानित /कायम विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये, **पुणे,अहमदनगर व नाशिक जिल्हे.**

विषय - **राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारीत करण्यात आलेल्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, संलग्नित महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालये आणि उच्च शिक्षण संस्थांमध्ये करणेबाबत..**

संदर्भ - १. शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग, एनईपी-२०२२/प्र.क्र.०९/विशि-३ शिकाना दि. २.७.२०२४.
२. मा. शिक्षण संचालक, उ.शि.म.रा. पुणे यांचे पत्र क्र. युएनआय/(१३६/२२)विशि-१/३५९२ दि. ४.७.२०२४.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय शासन निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे. कृपया अवलोकनी घ्यावे.

वरील संदर्भिय शासन निर्ण्यानुसार कळविण्यात येते की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० नुसार तयार करण्यात आलेल्या सुधारित पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून सर्व अकृषी विद्यापीठे, संलग्नित महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालये आणि उच्च शिक्षण संस्थांमध्ये करण्याचे निर्देश संदर्भिय शासन निर्णयानुसार देण्यात आलेले आहेत.

तरी संदर्भिय शासन निर्णयाप्रमाणे उचित कार्यवाही आपल्या स्तरावरुन करण्यात यावी.

(डॉ.केशव तुपे)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे १

सोबत - वरीलप्रमाणे शासन निर्णय.

प्रत - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० नुसार सुधारीत करण्यात आलेल्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठे, संलग्नित महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालये आणि उच्च शिक्षण संस्थांमध्ये करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: एनईपी-२०२२/प्र.क्र.०९ /विशि-३, शिकाना**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक: ०२ जुलै, २०२४

**संदर्भः**- १. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: एनईपी-२०२२/प्र.क्र.०९ /विशि-३, शिकाना दि. २६ डिसेंबर, २०२२

२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक एनईपी-२०२२/प्र.क्र.०९ /विशि-३, शिकाना दि. २० एप्रिल, २०२३

३. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक एनईपी-२०२२/प्र.क्र.०९ /विशि-३, शिकाना दि. १६ मे, २०२३

४. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक एनईपी-२०२२/प्र.क्र.०९ /विशि-३, शिकाना दि. ४ जुलै, २०२३

५. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन पत्र क्र. क्रमांक एनईपी-२०२२/प्र.क्र.०९ /विशि-३,शिकाना दि.१६.०६.२०२३

६. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन पत्र क्र. क्रमांक एनईपी-२०२२/प्र.क्र.०९ /विशि-३,शिकाना दि.२५ जानेवारी, २०२३

७. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन पत्र क्र. क्रमांक एनईपी-२०२२/प्र.क्र.०९ /विशि-३,शिकाना दि.१३.०३.२०२३

**शासन निर्णय:**

संदर्भाधीन दिनांक २६ डिसेंबर, २०२३ च्या शासन निर्णयान्वये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० च्या राज्यातील अंमलबजावणीच्या अनुषंगाने गठीत उपसमित्यांच्या अहवालातील शिफारशींच्या अंमलबजावणीसंदर्भात आढावा घेऊन येणा-या अडचणी निवारणासाठी, उपाययोजना सुचविण्यासाठी व मार्गदर्शन करणेसाठी डॉ. नितीन करमळकर, माजी कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समितीची स्थापना करण्यात आली आहे.

सदर समितीच्या शिफारशी विचारात घेऊन संदर्भाधीन दिनांक २०.०४.२०२३ च्या शासन निर्णयान्वये कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी व इतर अभ्यासक्रमांसाठी (AICTE, PCI, BCI, CoA, NCTE इ. सारख्या नियामक संस्थांची मान्यता आवश्यक असलेले अभ्यासक्रम वगळून) अभ्यासक्रम व श्रेयांक आराखड्यासंदर्भात निर्देश जारी करण्यात आले आहेत.

संदर्भाधीन दिनांक १६.०५.२०२३ च्या शासन निर्णयान्वये एक्झिट पर्याय/ एक वर्षाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमासह २ वर्षाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी अभ्यासक्रम व श्रेयांक आराखड्यासंदर्भात सुधारीत निर्देश जारी करण्यात आले आहेत.

यासंदर्भात संदर्भाधीन दिनांक १६.०६.२०२३ च्या शासन पत्रान्वये सर्व अकृषि विद्यापीठांना सुधारीत सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार, शासन निर्णय, दिनांक १६ मे, २०२३ अन्वये **पदव्युत्तर अभ्यासक्रमासंदर्भात** दिलेले निर्देश सन २०२३-२४ शैक्षणिक वर्षापासून राज्यातील सर्व विद्यापीठांमध्ये आणि महाविद्यालयांमध्ये अनिवार्यपणे स्विकारुन लागू करणेबाबतच्या सूचना, शासन निर्णय दिनांक २० एप्रिल, २०२३ अन्वये **प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रमासंदर्भात** देण्यात आलेल्या निर्देशांची अंमलबजावणी सर्व विद्यापीठीय स्तरावर आणि स्वायत्त महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून लागू करण्याबाबतच्या सूचना तसेच, याशिवाय स्वायत्त महाविद्यालयांव्यतिरिक्त जर विद्यापीठाशी संलग्नित काही महाविद्यालयांना स्वतःहून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून करावयाची असल्यास अशा महाविद्यालयाना त्यांच्या जवळच्या स्वायत्त महाविद्यालयाच्या मदतीने अंमलबजावणी करण्याची मूभा देण्याबाबतचा निर्णय संबंधित विद्यापीठाने घेण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

संदर्भाधीन दिनांक ०४.०७.२०२३ च्या शासन निर्णयान्वये अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रम आराखडा, श्रेयांक आराखड्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

उपरोक्त नमूद दिनांक २०.०४.२०२३, दिनांक १६.०५.२०२३, दिनांक ०४.०७.२०२३ च्या शासन निर्णयांन्वये करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने स्पष्टीकरणात्मक सूचना संदर्भाधीन दि.२५.०१.२०२४ व दि.१३.०३.२०२४ च्या शासनपत्रान्वये केल्या आहेत.

**आता, संदर्भाधीन शासन निर्णयांन्वये तसेच शासनपत्रांन्वये देण्यात आलेल्या सर्व सूचनांचे अनुपालन करुन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० नुसार तयार करण्यात आलेल्या सुधारीत पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठे, संलग्नित महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालये आणि उच्च शिक्षण संस्थांमध्ये करण्याचे निर्देश या शासन निर्णयान्वये देण्यात येत आहेत.**

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२४०७०२१२३७२२६९०८ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

PRAVIN NAMDEV DHAWALE

Digitally signed by PRAVIN NAMDEV DHAWALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=71f6c07083404 6a05773a0b65eb43ceac21e846e9d396ba3b358b38db8a78263, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=951BB5E608AF9B684DC19CA274C852B0792077228C41D0AFFAEF6444F8C7A3C5, cn=PRAVIN NAMDEV DHAWALE
Date: 2024.07.02 12:54:02 +05'30'

(प्र. ना. ढवळे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
७. कुलगुरु, सर्व अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
८. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

९. संचालक, उच्च शिक्षण, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे.
१०. संचालक, तंत्र शिक्षण, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई
११. उप सचिव (विशि), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
१२. निवडनस्ती (विशि-३).